# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १७ जुलै, २०१३
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

(अ) **तारांकित प्रश्न.**

(ब) **तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** : "बीड (ता.जि.बीड) येथील प्रशासन व धान्य दुकानदार यांनी मिळून केलेल्या घोटाळ्याबाबत" या विषयावरील प्रा.सुरेश नवले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. व श्री. राजन तेली, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १३०५३ ला दिनांक ३० मार्च, २०११ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र मोटार वाहन (तिसरी सुधारणा) नियम, २०१३ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमव्हीआर.०२११/प्र.क्र. १०७ पुनर्बांधणी क्रमांक २६/परि -२, दिनांकित २४ जून, २०१३" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**चार : (अ) लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

**(मंगळवार, दिनांक १६ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना ) - (१ ते ३) -**

(१) **श्रीमती विद्या चव्हाण,** श्री.किरण पावसकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबईतील मालाड पूर्व आप्पा पाडा येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या इमारतीवर अनधिकृतरित्या ३० मोबाईल टॉवर उभारलेले असणे, या शाळेतील जवळपास २५०० विद्यार्थ्यांच्या तसेच, परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर यामुळे होत असलेला विपरित परिणाम तसेच, या शाळेतील संचालक समशेर सिंह यांनी या शाळेच्या

मुख्याध्यापिकेच्या नकली सह्या करुन चुकीच्या जाहिराती काढल्यामुळे या मुख्याध्यापिकेवर दखलपात्र गुन्हे नोंदविले जाऊन दंडात्मक कारवाई होणे, या शाळेतील मुख्याध्यापिका, शिक्षकांना संचालकांमार्फत होत असलेली दमदाटी शिक्षक भरतीसाठी अवैधरित्या सुमारे लाख-लाख रुपये घेऊन त्यांची फसवणूक करणे, या संदर्भात शालेय शिक्षण विभाग, पोलीस स्टेशन येथे दिनांक ४ जुलै, २०१३ रोजी वा त्यासुमारास तक्रार करुनही त्याची दखल न घेणे, परिणामी या शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापिका, विद्यार्थी व परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यांत येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री.संजय दत्त,** अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबईतील महापालिका रुग्णालयात मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक लागणारी यंत्रे, व्हेंटिलेटर, जीवरक्षक उपकरणे आणि औषधांची खरेदी गेल्या तीन वर्षापासून रखडली असल्याचे माहे २४ जून, २०१३ रोजी वा त्यासुमारास उघकीस येणे, सन २०१० पासून मेंदूवरील शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या ड्रील मशीन खरेदी करणे, अपेक्षित असताना २०१३ पर्यंत खरेदीच करण्यात न येणे, त्याचप्रमाणे औषध व डेंग्यू चाचणी किट्सची खरेदी, तसेच एक्स-रे मशीन, सर्जिकल ड्रेसिंगचीही खरेदी रखडली असल्याचे निदर्शनास येणे, केईएम रुग्णालयात उपकरण खरेदीच्या ३२ फाईल्स व कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्यांकडे सहा फाईल्स प्रलंबित असल्याचे आढळून येणे, सायन आणि नायर रुग्णालयांतही औषध खरेदीच्या फाईल्स पडून असणे, सदर उपकरणांची खरेदी रखडवून ती भाडेतत्वावर घेतली जात असल्याचे आढळून येणे, यामुळे पालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत असून रुग्णांसाठी योग्य सेवा मिळत नसणे, यामुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री.दिवाकर रावते,** विनायक राऊत **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वाढते शहरीकरण, कारखानदारी आणि बांधकामांमुळे २३ किलोमीटर इतका मोठा प्रवाह लाभलेल्या या खाडीला प्रदूषणाचा

पडलेला विळखा, या महानगरपालिकेकडे स्वत:ची क्षेपणभूमी (डंपिंग ग्राऊंड) नसल्याने रोज ७०० मेट्रीक टन घनकचरा खाडी क्षेत्रात टाकण्यात येणे, त्यामुळे तिवराची झाडे, कांदळवन आणि जल वनस्पतींचा ऱ्हास होणे, पर्यावरणाचे संतुलन बिघडून कचरा कुजण्याच्या प्रक्रियेमुळे विषारी वायु निर्माण होणे, या वायूमुळे तेथील नागरिकांना श्वसनाचे तसेच अन्य विकार जडत असल्याचे उघडकीस येणे, सदर खाडी सध्या एका मोठ्या गटारात परिवर्तित झाल्याचे ठाणे महापालिकेच्या "पर्यावरण सद्य:स्थिती" अहवालातही नमूद करणे, दिवा येथील खाडी भागात भराव टाकणाऱ्यांवर व महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची, तसेच भराव टाकून करण्यात आलेल्या जागेवर पुन:श्च जलवनस्पतींची लागवड करण्याची नितांत आवश्यकता, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, त्यांनी याबाबत आंदोलन करण्याचा घेतलेला पवित्रा, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **ॲड.आशिष शेलार,** सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात भारत राखीव बटालियन (IRB) -३ या स्वतंत्र युनिटची स्थापना कोल्हापूर येथे, तसेच न्यायिक प्रयोगशाळा (Forensic Laboratory) ही कोल्हापूर व नांदेड येथे स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला असणे, या बटालियनसाठी गृह विभागाने ५० एकर जमीनही दिलेली असणे, परंतु प्रत्यक्षात या युनिटसाठी ३०० एकर जमिनीची मागणी बटालियनने केलेले असणे, हे संपूर्ण युनिट स्थापनेसाठी ७७ कोटींची आवश्यकता असणे, या बटालियनसाठी सशस्त्र पोलीस शिपाई अंतर्गत ६५७ जवानांची नियुक्तीही केलेली असणे, या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असलेले हे युनिट उभारण्यासाठी व या बटालियनला लागणारे सर्व अत्याधुनिक साहित्य पुरवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ब) लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**उद्योग मंत्री** : दिनांक १४ जुलै, २००६ रोजी श्री. भास्कर जाधव व इतर वि.प.स. यांनी नियम १०१ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार, "चिपळूण शहरालगत (जि.रत्नागिरी) असणाऱ्या खेर्डी औद्योगिक

वसाहतीमधील सुमारे ९० टक्के कारखाने बंद अवस्थेत असणे", याबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**पाच : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सहा : शासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ -**

(१) सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ७ - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, २०१३.

(२) सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ८ - महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३.

**सात : (मंगळवार, दिनांक १६ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव ) -**

**सर्वश्री. हेमंत टकले,** रमेश शेंडगे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. सुभाष चव्हाण, प्रकाश बिनसाळे, संजय दत्त, श्रीमती विद्या चव्हाण, निरंजन डावखरे, विक्रम काळे, अब्दुल्ला खान दूर्राणी, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, दिपकराव साळुंखे, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री एम.एम.शेख, ॲड.जयदेवराव गायकवाड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्यात जेष्ठ नागरिकांची वाढत असलेली संख्या, जेष्ठ नागरिकांनी उमेदीच्या काळात त्यांच्या मुलांचे शिक्षण व त्यांच्या विकासासाठी व इतर बाबींसाठी आपल्या आयुष्याची सर्व पूंजी खर्च करणे, मात्र, हीच मुले त्यांच्याकडे वृध्दापकाळात लक्ष देत नसणे, घरातील वृध्द व्यक्तींकडे एक ओझे म्हणून पाहत असणे, त्यांच्या जेवणाची व औषधांची होत असलेली आबाळ, बरेचसे जेष्ठ नागरीक एकटे जीवन जगत असून त्यांच्यावर होत असलेले हल्ले, राज्यात सुमारे ४० जेष्ठ नागरिकांच्या झालेल्या हत्या, जेष्ठ नागरिकांसाठी केंद्र शासनाने सन २००७ मध्ये कायदा करणे, परंतु राज्य शासनाने अद्यापही ट्रीब्युनल नेमलेले नसणे, वृध्दापकाळात वयोमानानुसार आजारात वाढ होत असल्यामुळे त्यांचा सर्वात जास्त खर्च औषधोपचारावर होत असणे, या जेष्ठ नागरिकांना मोफत औषधे देण्याची आवश्यकता, केंद्र शासनाच्या निवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध असणे, त्याच धर्तीवर

राज्य शासनाच्या निवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना खाजगी रुग्णालयांसह सर्वत्र मोफत वैद्यकीय सेवा देण्याबाबत शासनाने त्वरीत निर्णय घेण्याची आवश्यकता, राज्यात वृध्दाश्रमाची संख्या वाढविण्याची आवश्यकता, इतर राज्याप्रमाणेच या राज्यातील जेष्ठ नागरिकांना राज्य शासनाने किमान दोन हजार रुपये निवृत्त वेतन देण्याची होत असलेली मागणी, जेष्ठ नागरीकांना उर्वरित जीवन समाधानाने जगता यावे यासाठी शासनाने २००४ मध्ये मसुदा जाहिर करणे, परंतु त्याचा लाभ जेष्ठ नागरिकांना न होणे, त्यामुळे नवीन मसुदा तयार करुन धोरणात्मक निर्णय जाहिर करण्याची नितांत आवश्यकता, जेष्ठ नागरिकांना आयुष्याच्या संध्याकाळी केवळ शारिरीकच नाहीतर भावनिक आधाराची सुध्दा गरज असते हे लक्षात घेता जेष्ठ नागरिकांसाठी ठोस कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) डॉ.नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"समाजकल्याण विभागाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या इंदापूर, बारामती, सासवड, पुणे, कोरेगाव पार्क या पाच वसतिगृहात गृहपाल नसल्याची बाब माहे जून, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, तसेच इंदापूर येथील मुलींच्या वसतिगृहाला गेल्या पाच ते सहा महिन्यापासून गृहपाल तसेच पहारेकरी, सफाई कर्मचारी नसणे, अनेकदा ग्रामीण भागात आजूबाजूला मनुष्यवस्ती नसल्याने व पुण्यापासून साधारण १५० कि.मी. दूर राहणाऱ्या या मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणे, शहर आणि परिसरात महिला, मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला असतांनाच समाजकल्याण विभागाने अशा प्रकारे विद्यार्थ्यांनीच्या सुरक्षेबाबत गाफील राहिल्याने विद्यार्थीनींच्या पालकांमध्ये व नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतापाचे वातावरण, याबाबत शासनाने या वसतिगृहांमध्ये आवश्यक तो कर्मचारी वर्ग व अन्य सोयी-सुविधा तातडीने पुरविण्याची आवश्यकता."

**(२) श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील घरेलू कामगारांच्या कल्याणासाठी शासनाने घरेलू कामगारांना जनश्री विमा योजनेचा फायदा देणे, यामुळे कामगारांना विमा संरक्षणासह त्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मिळणे, शालेय पोषण आहारातील तात्पुरत्या व अल्प मानधनावर काम करणाऱ्या ग्रामीण

भागातील कामगार महिलांना विम्याची आवश्यकता असणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी कामगार कल्याण विभागाकडे मागणी करणे, या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १६ जुलै, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.